# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, पालघर

**वाचले :-**

१. सार्वजनिक आरोग्य विभाग, नवीन मंत्रालय मुंबई यांचेकडील करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेली अधिसुचना क्र/करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४/०३/२०२० नुसार महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम २०२०.
२. साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.
३. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील ३४ (c) व ५१ (b)
४. भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८.
५. फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४.
६. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसुचना क्रमांक - No:DMU/2020/CR.92/DisM-1, dt.04/06/2021.
७. या कार्यालयाचे आदेश क्र/गृह/का.१/टे.४/मनाई आदेश/पर्यटन/एस.आर.क्र.२३/२०२१ दि.१०/०६/२०२१.

क्र/गृह/का.१/टे.४/मनाई आदेश/पर्यटन/एस.आर.क्र.२४/२०२१ दि.१२/०६/२०२१.

## सुधारित आदेश

ज्याअर्थी पालघर जिल्हयामध्ये मान्सून कालावधीत मोठया संख्येने पर्यटक धबधबे, तलाव, धरणे व समुद्र किनारी येत असतात व त्याठिकाणी जिवीतहानी होण्याच्या घटना घडत असतात. सद्यस्थितीमध्ये पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड-१९ चा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता, पावसाळयात पालघर जिल्हयामध्ये असलेले धबधबे, तलाव किंवा धरणे, समुद्र किनारे इत्यादि पर्यटन ठिकाणी मोठया प्रमाणात पर्यटक पर्यटनासाठी आल्याने त्या ठिकाणी मोठया प्रमाणात गर्दी होण्याची व सामाजिक अंतर राखले न गेल्यास तेथे कोविड-१९ चा संसर्ग व प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे त्या ठिकाणी पर्यटकांची सुरक्षा अबाधित रहावी व कोणत्याही प्रकारची जिवीतहानी होऊ नये म्हणून या कार्यालयाचे उपोद्घातातील अ.क्र.७ अन्वये पालघर जिल्हयातील वसई तालुका वगळून उर्वरीत ७ तालुक्यांचे क्षेत्रातील सर्व धबधबे, तलाव, धरणे, समुद्र किनारे, किल्ले इत्यादि पर्यटन स्थळांवर दि.११/०६/२०२१ ते दि.०८/०८/२०२१ या कालावधीमध्ये सर्वांना जाण्यास मनाई आदेश लागू करण्यात आला आहे. सदरच्या आदेशामध्ये पर्यटन स्थळावर जाण्यास बंदी घालण्यात आलेली असल्याने तसेच पालघर जिल्हा हा पर्यटन जिल्हा असल्याने सदर आदेशात सुधारणा करणे आवश्यक आहे, असे माझे मत झाले आहे. **त्यामुळे या कार्यालयाचा उपोद्घातातील अ.क्र.७ मधील दि.१०/०६/२०२१ रोजीचा आदेश रद्द करण्यात येत आहे.**

त्याअर्थी मी **डॉ माणिक गुरसळ, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी पालघर** मला फौजदारी प्रक्रिया संहिता-१९७३ चे कलम १४४, साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन **पालघर जिल्हयातील वसई तालुका वगळून उर्वरीत ७ तालुक्यांचे क्षेत्रातील सर्व धबधबे, तलाव, धरणे, समुद्र किनारे या पर्यटन स्थळांच्या १ कि.मी. परीसरात दि.१२/०६/२०२१ ते दि.०९/०८/२०२१ या कालावधीमध्ये खालील बाबींकरीता प्रतिबंधात्मक आदेश लागू करीत आहे.**

१. पावसामुळे वेगाने वाहणाऱ्या पाण्यात उतरणे, खोल पाण्यात उतरणे व त्यामध्ये पोहणे.
२. धबधब्याच्या उगम स्थानी जाणे अथवा पाण्याच्या प्रवाहाखाली बसणे.



पार्श्वनाथ ९, बिडको नाका, जिल्हा पालघर. पिन कोड – ४०१ ४०४
संपर्क क्र. ०२५२५ – २५३१११ ▫ ई-मेल : collector.palghar-mh@gov.in ▫ वेबसाईट : palghar.gov.in

३. पावसामुळे धोकादायक झालेली ठिकाणे, धबधबे, दऱ्यांचे कठडे, धोकादायक वळणे इ. ठिकाणी सेल्फी काढण्यास व कोणत्याही स्वरुपाचे चित्रीकरण करणे .

४. पावसामुळे निर्माण झालेले नैसर्गिक धबधब्याचे परिसरामध्ये मद्यपान करण्यास किंवा मद्यधुंद अवस्थेत प्रवेश करणे, मद्य बाळगणे, मद्य वाहतूक करणे, अनधिकृत मद्य विक्री करणे व उघडयावर मद्य सेवन करणे.

५. वाहतुकीचे रस्ते तसेच धोकादायक ठिकाणी वाहने थांबवणे.

६. वाहन अतिवेगाने चालविणे तसेच वाहतूकीस परिणाम होईल अशा प्रकारे वाहने चालविणे.

७. वाहनांची ने-आण करताना बेदरकारपणे वाहन चालवून इतर वाहनांना धोकादाय स्थितीत ओव्हरटेक करणे.

८. सार्वजनिक ठिकाणी खादयपदार्थ, कचरा, काचेच्या व प्लास्टीकच्या बाटल्या, थर्माकॉलचे व प्लास्टीकचे साहित्य उघडयावर इतरत्र फेकणे.

९. सार्वजनिक ठिकाणी येणाऱ्या महिलांची छेडछाड करणे, टिंगळटवाळी करणे, महिलांशी असभ्य वर्तन करणे, असभ्य व अश्लील हावभाव करणे, शेरेबाजी करणे अथवा लज्जा निर्माण होईल असे कोणतेही वर्तन करणे.

१०. सार्वजनिक ठिकाणी मोटया आवाजात संगीत यंत्रणा वाजवणे, डि.जे. सिस्टीम वाजवणे, गाडीमधील स्पिकर/उफर वाजवणे व त्यामुळे ध्वनी प्रदुषण करणे.

११. ज्या कृतीमुळे ध्वनी, वायू व जल प्रदुषण होईल अशी कोणतीही कृती करणे.

सदरच्या मनाई आदेशाचा भंग केल्यास संबंधितांविरुध्द भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील ५१ (b) नुसार कारवाई करण्यात येईल.

सदरचा आदेश आज दि.१२/०६/२०२१ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.

**सही/-xxx**
**(डॉ माणिक गुरसळ)**
**जिल्हादंडाधिकारी पालघर तथा**
**अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन**
**प्राधिकरण, पालघर**

**प्रत:-**

१) मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
३) पोलीस अधीक्षक पालघर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी व प्रसिध्दीकरीता
४) मा.पोलीस अधीक्षक महामार्ग पोलीस टाणे यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
५) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार / पालघर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी व प्रसिध्दीकरीता.
६) सहाय्यक जिल्हादंडाधिकारी डहाणू यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
७) उपविभागीय दंडाधिकारी पालघर/डहाणू/जव्हार/वाडा यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
८) उप परिवहन प्रादेशिक अधिकारी, वसई यांना माहिती तथा पुढील कार्यवाहीसाठी.
९) कार्यकारी दंडाधिकारी पालघर/डहाणू/तलासरी/मोखाडा/जव्हार/विक्रमगड/वाडा यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
१०) जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर यांना पुढील कार्यवाहीसाठी.
११) जिल्हा माहिती अधिकारी पालघर यांना माहिती तथा प्रसिध्दीकरीता.

जिल्हा दंडाधिकारी पालघर
जिल्हा पालघर

**जिल्हादंडाधिकारी पालघर तथा**
**अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन**
**प्राधिकरण, पालघर**